ePaper

# 'लव्ह जिहाद' रोखण्यासाठी कायदा करणार; देवेंद्र फडणवीस



| वर्ष - 6 | अंक - 334 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 24 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- भूखंड खरेदीसाठी पुणेकरांच्या उड्या
- 'टॉप-टेन' खासदारांमध्ये श्रीरंग बारणे
- छापील अक्षरांचे महत्व आजही अबाधित आहे !


# बदनामीच्या भितीने थकबाकीदार वळणीवर!

## मिळकतकर भरणा वाढला : महापालिका प्रशासनाच्या क्लुप्तीची फलश्रुती

। पिंपरी। महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील 10 लाखांवरील थकबाकीदारांची दैनिकांमधून नावे प्रसिद्ध करताच मालमत्ता कराचा भरणा वाढला आहे. मागील 8 दिवसांपासून थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध केली जात असून या कालावधीत 40 ते 50 कोटी रुपयांच्या मालमत्ता कराचा भरणा झाला आहे. त्यामुळे कर आकारणी व कर संकलन विभागाच्या थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध करण्याच्या 'फंड्या'चा फायदा होताना दिसत आहे. आपल्या नावाची अपप्रसिद्धी टाळण्यासाठी इतर थकबाकीदार कराचा भरणा करताना दिसून येतात.**

महापालिकेचा मालमत्ता कर हा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाला 2022-23 या आर्थिक वर्षात 950 कोटी रुपयांचे उदिष्ट आहे. आत्तापर्यंत 731 कोटी रुपयांचा भरणा झाला आहे. आर्थिक वर्ष संपण्यासाठी आठ दिवस बाकी आहेत. त्यामुळे कर वसुलीची मोहिम तीव्र केली आहे.

महापालिका कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या मालमत्ताधारकांपैकी ज्या मालमत्ता धारकांस 2022-23 या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे बील दिले. घरभोटी, सूचना, नोटीस देवूनसुद्धा कराची थकित रक्कम विहित मुदतीत भरणा केलेला नाही. अशा 10 लाखांवरील थकबाकीदारांची नावे दैनिकांमधून प्रसिद्ध केली जात आहेत. 2022-23 अखेरची मालमत्ता कराची थकीत संपूर्ण रक्कम जवळच्या विभागीय कर संकलन कार्यालयात रोख, धनादेश, डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा ऑनलाइन पद्धतीने तत्काळ भरुन मालमत्तेचा पाणीपुरवठा खंडित होणे, स्थावर व जंगम मालमत्ता जप्ती होणे अशी कटू कारवाई टाळण्याचे आवाहन केले जात




### वृत्तपत्रांमध्ये नावे येताहेत छापून...

मागील आठ दिवसांपासून विविध दैनिकांमधून 10 लाखांवरील थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध केली जात आहेत. पहिल्यांदाच थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध करण्याचा फंडा महापालिकेने अवलंबला आहे. त्याचा फायदा होताना दिसून येत आहे. मालमत्ता कराचा भरणा वाढला आहे.थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध होताच मागील आठ दिवसांत 40 ते 50 कोटी रुपयांचा भरणा झाला असल्याचे कर संकलन विभागाकडून सांगण्यात आले. आपल्या नावाची अपप्रसिद्धी टाळण्यासाठी इतर थकबाकीदार कराचा भरणा करताना दिसून येतात.

# पाण्याचे दुर्भिक्ष लादणाऱ्यांना धडा शिकवा!

## अजित गव्हाणे : राष्ट्रवादीच्या सभेत प्रशासकीय कारभाराचा निषेध

। पिंपरी। महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली सध्या महापालिकेतील कारभार सुरू आहे. केवळ राजहट्टापायी शहरवासियांवर प्रशासक आणि प्रशासनाने पाण्याचे दुर्भिक्ष लादले आहे. या कारभाराचा निषेध करावा तेवढा थोडाच असून भाजपच्या दबावामुळे आणि भ्रष्ट कारभारामुळे शहराची आणि महापालिकेची पुरती वाट लागल्याची घणाघाती टीका राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केली.



गुरुवारी (दि. 23) नेहरूनगर येथील साई मंदिराच्या सभागृहात पिंपरी चिंचवड शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसची आठवी मासिक सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अजित गव्हाणे बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते योगेश बहल,कार्याध्यक्ष राहुल भोसले,महिला अध्यक्षा कविता आल्हाट, युवकचे अध्यक्ष इम्रान शेख, महिला निरीक्षक शितल हगवणे, माजी नगरसेवक शाम लांडे, विनायक रणसुभे, विक्रांत लांडे, समीर मासुळकर, माजी महापौर वैशाली घोडेकर, गीता मंचरकर, संगीता ताम्हणे, वर्षा जगताप, विजय लोखंडे, गोरक्ष लोखंडे, संजय अवसरमल यांच्यासह पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे बोलताना अजित गव्हाणे म्हणाले, गेल्या साडेतीन वर्षांपासून शहरवासियांवर पाणीटंचाईचे संकट भाजपच्या लोकप्रतिनिधींनी निर्माण केले. भ्रष्टाचार, लाचखोरी आणि खंडणीखोरीमुळे शहराचे नाव मलिन करण्याचे कृत्य या सत्ताधाऱ्यांनी केले. आता केवळ प्रसिद्धीच्या हव्यासापोटी चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्राचे उद्घाटन केले जात नाही. त्यामुळे ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर शहरात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या पाणीटंचाईच्या आडून टँकरची लॉबी पोसण्याचे पाप केले जात आहे. हा सर्व प्रकार राज्यातील सत्तेच्या जोरावर प्रशासकाच्या आडून केला जात आहे.

# भूखंड खरेदीसाठी पुणेकरांच्या उड्या!

## गेल्या वर्षी शहरानजीक अडीच हजारांहून अधिक जमिनींचे व्यवहार

। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आपल्या हक्काचे, स्वत:चे घर असावे, अशी प्रत्येक नागरिकाची इच्छा असते. आता चांगल्या शहरात घरासोबतच ‘वीकएंड होम’साठी पुण्यापासून जवळच्या अंतरावर भूखंड (प्लॉट) घेण्याचा कल झपाट्याने वाढतो आहे. गेल्या वर्षी (२०२२) पुणे आणि आसपासच्या परिसरात अडीच हजारांहून अधिक जमिनींचे व्यवहार झाले असून, कोव्हिडपूर्व काळापेक्षा जमिनीच्या (प्लॉट्स) व्यवहारांची ही संख्या ३० ते ४० टक्क्यांनी अधिक आहे.**

गेल्या काही वर्षांपासून मोठे गृहप्रकल्प उभारणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांनी सदनिकांप्रमाणेच प्लॉट्सची विक्रीही मोठ्या प्रमाणावर सुरू केली आहे. या प्रकल्पांना करोनानंतर उत्तम प्रतिसाद मिळत असून, २०२२मध्ये गेल्या १० वर्षांमधील सर्वाधिक म्हणजेच अडीच हजार प्लॉट्सचे व्यवहार झाले आहेत. २०२३च्या पहिल्या तिमाहीतही हाच ट्रेंड कायम असल्याचे पुण्याच्या ‘रिअल इस्टेट’संदर्भात सर्वेक्षण करणाऱ्या एका खासगी संस्थेच्या सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे.

बांधकाम व्यावसायिकांनी सांगितलेल्या माहितीनुसार, गेल्या काही वर्षांत पुण्याच्या आसपासच्या परिसरात स्वत:ची जमीन घेऊन तिथे घर बांधण्याचा ट्रेंड शहरात रुजू लागला. शहरात येण्यासाठी दळणवळणाच्या सुविधा वाढल्याने शहराच्या बाहेर शांत ठिकाणी आपल्या हक्काच्या



जागेत हवे तसे घर बांधून राहण्यासाठी नागरिक उत्सुक आहेत. छोट्या-छोट्या प्लॉट्सची विक्री करण्याची परवानगी मिळाल्याने ‘सेकंड होम’चा पर्याय म्हणूनही अनेक जण एक ते दोन गुंठ्यांमध्ये गुंतवणूक करताना पाहायला मिळत आहेत. यामुळेच गेल्या काही वर्षांत प्लॉटची विक्री वाढत असून, या विक्रीने नुकताच उच्चांक गाठला आहे.

**जमीन विक्रीचा तपशील**

| वर्षे | विक्री झालेल्या प्लॉटची संख्या |
|---|---|
| २०१७ | ८८२ |
| २०१८ | १,४०२ |
| २०१९ | २,०३२ |
| २०२० | १,२३४ |
| २०२१ | १,८०६ |
| २०२२ | २,५८२ |

### जमिनीच्या किमती वाढूनही विक्रीत घट नाही

**गेल्या पाच वर्षांत पुणे शहराच्या आसपासच्या जमिनींचा प्रति चौरस फूट दर वाढताच राहिला आहे. दोन वर्षांपूर्वी सरासरी चार हजार रुपये असलेला दर आता ५,५०० ते ६,००० रुपयांच्या घरात जाऊन पोहोचला आहे; तरीही विक्रीवर त्याचा काहीच परिणाम झालेला नाही.**

“ प्लॉट खरेदी करण्याकडे पुणेकर नागरिकांचा कल वाढला आहे. रिअल इस्टेट क्षेत्रात केलेली गुंतवणूक अधिक सुरक्षित आणि अधिक मोबदला देणारी असल्याने नागरिक त्यात गुंतवणूक करीत आहेत. करोनाकाळात एक घर असलेल्या नागरिकांची स्वत:चे दुसरे घर असावे अशीही भावना तयार झाली. यामुळे मग प्लॉट खरेदी करून तेथे ‘सेकंड होम’ बांधण्याला अधिक पसंती दिली जात आहे. ‘पीएमआरडीए’च्या नव्या विकास आराखड्यामुळेही जमीन विक्री सुलभ झाली आहे.

- कपिल गांधी

“ मध्यम आणि उच्च मध्यमवर्गीय भागाच्या विस्तारामुळे लोकांचा कल आणि गुंतवणूक ‘लक्झरी रिअल इस्टेट’मध्ये अधिक होत आहे. वाढलेले उत्पन्न हे त्याचे मुख्य कारण आहे. वाढत्या शहरीकरणामुळेही शहराच्या काही अंतरावर निसर्गाच्या सान्निध्यात घर असावे, अशीही काही जणांची भावना आहे. स्वतंत्रपणे जगण्याची संधी आणि ‘गेटेड कम्युनिटी’मध्ये राहण्याचे फायदे लोकांना प्लॉट खरेदी करण्यासाठी आकर्षित करीत आहेत.

- आनंद नाईकनवरे,नाईकनवरे डेव्हलपर्स

---

# राहुल गांधींविरुद्धचा निकाल

# भाजपच्या कपटी षडयंत्राचा भाग; काँग्रेसचा आरोप

## सुरत न्यायालयाच्या निकालावरून मोहन जोशींनी घेतला केंद्र सरकारचा समाचार

। पुणे। महाईन्यूज ।

**देशभरात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांचा प्रभाव वाढत आहे. त्यातून आगामी २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे सरकार सत्तेवरून फेकले जाणार आहे. याची कल्पना आल्यानेच खासदार राहुल गांधींवर विविध आरोप केले जात आहेत. खटले दाखल करून त्यांना लोकसभेतून अपात्र करण्याचे षडयंत्र मोदी सरकार व भाजपने रचले आहे. सुरत सत्र न्यायाल्याचा निकाल हा त्यातीलच एक भाग आहे. मात्र, यामुळे आता देशातील काँग्रेस कार्यकर्ते पेटून उठले आहेत. येत्या लोकसभा निवडणुकीत केंद्रातून मोदी सरकारला काँग्रेस निश्चित पराभूत करेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केले आहे.**




मोहन जोशी म्हणाले की, "कर्नाटकातील कोलार येथे २३ एप्रिल २०१९ रोजी झालेल्या निवडणुकीत जाहीरसभेत केलेल्या भाषणात ‘नीरव मोदी, ललित मोदी, नरेंद्र मोदी (NARENDRA MODI) यांचे आडनाव कॉमन का आहे? सर्व चोरांचे नाव मोदी का असते?’ अशी टीका काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांनी केली होती. या टीकेमुळे गुजरातमधील मोदी समाजाची मानहानी झाली असे सांगून दाखल गांधींविरोधात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्या खटल्यात सुरत सत्र न्यायालयाने खासदार राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. हा निकाल म्हणजे भाजपचा राजकीय विशाल षडयंत्राचा भाग आहे."

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप (BJP) म्हणजे भारत देश नाही, असे असूनही लंडनमध्ये मोदी सरकारवर केलेली टीका म्हणजे भारतविरोधी बाब आहे, असे सांगत भाजपने गेल्या आठवड्यात संसदेचे कामकाज बंद पाडले, हा देखील त्या षडयंत्राचा भाग असल्याचे जोशी यांनी यावेळी सांगितले.

जोशी म्हणाले, "भारत जोडो यात्रेनंतर साऱ्या देशात बदलेल्या वातावरणामुळे मोदी सरकार व भाजपला धडकी भरली आहे. त्यातच प्रचंड महगाई, बेकारी आणि अर्थव्यवस्थेचा खेळखंडोबा यामुळे देशातील जनात मोदी सरकारवर संतप्त झालेली आहे. त्यातून २०२४च्या लोकसभा निवडणुकीत पराभूत होणार असल्याची प्रचिती भाजपला जागोजागी येऊ लागली आहे. पुण्यातील कसबा विधानसभा निवडणूक ही त्याचेच एक उदाहरण आहे."

### काँग्रेस पक्ष झुकणार नाही

**मोहन जोशी म्हणाले की, "भाजपच्या अशा कारवायांपुढे काँग्रेस (CONGRESS) पक्ष झुकणार नाही. लोकशाहीतील निवडणूक आयोग सत्र न्यायालय यांच्यावर दडपण आणून स्वतःला हवे तसे निर्णय लाऊन घेतले जातात. आता मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अदाणी प्रेम उघड झाल्यामुळे ते आणि त्यांचा भाजपा पक्ष घायकुतीला आला आहे. खासदार गांधी यांच्या विरोधातील षडयंत्राचा मुकाबला करण्यासाठी व लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेस कार्यकर्ते जेलभरो आंदोलन करणार आहे."**

# 'टॉप-टेन' खासदारांमध्ये श्रीरंग बारणे!

## » लोकसभेत 508 प्रश्न विचारून पटकाविले दुसरे स्थान : लोकसभेच्या संकेतस्थळावरील माहिती

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

'गेट वे पॉलिटिकल स्टॅटेजिक' संस्थेमार्फत सतराव्या लोकसभेच्या चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील पहिल्या सत्रापर्यंतच्या देशातील खासदारांच्या कामगिरीचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यानुसार संसदेतील कामकाजात सक्रिय सहभागी होणा-या 'टॉप-टेन'मध्ये मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचा समावेश आहे. १४८ वेळा चर्चेत सहभाग आणि ५०८ प्रश्न विचारत खासदार बारणे यांनी दुसरा क्रमांक पटकाविला आहे. महाराष्ट्रातील अन्य तीन खासदार पहिल्या दहामध्ये आहेत.

देशाच्या लोकसभेतील खासदारांच्या कामाचे मुल्यांकन केले जाते. त्यानुसार सतराव्या लोकसभेतील खासदारांच्या कामगिरीचे मुल्यांकन केले आहे. त्यातील पहिल्या दहा खासदारांची यादी लोकसभेच्या संकेतस्थळावर अधिकृत प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये मावळचे खासदार श्रीरंग बारणे दुस-या स्थानावर आहेत. महाराष्ट्रातील अन्य तीन खासदार पहिल्या दहामध्ये आहेत. भाजपचे तीन, शिवसेनेचे तीन, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेसचा एक आणि डीएमकेचे दोन असे खासदार पहिल्या दहाच्या यादी आहे.

खासदार श्रीरंग बारणे यांनी आत्तापर्यंत सतराव्या लोकसभेत ५०८ प्रश्न विचारले आहेत. १४८ वेळा चर्चेत सहभाग घेतला. सभागृहातील उपस्थितीती ९४ टक्के असून दहा टक्के खासगी विधेयके मांडली आहेत. सोहाळाव्या लोकसभेत देखील कामकाजात खासदार बारणे अग्रभागी होते. सतराव्या लोकसभेतही खासदार बारणे यांनी आपले स्थान कायम ठेवले आहे. खासदार श्रीरंग बारणे हे सातत्याने मावळातील प्रश्न लोकसभेत मांडतात. त्याबाबत आवाज उठवितात. या कामगिरीमुळे खासदार श्रीरंग बारणे यांना सलग सातवेळा संसदरत्न, महासंसदरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

लोकांमध्ये राहणारा, लोकांसाठी चोवीस तास उपलब्ध असणारा, जमिनीवर राहून काम करणारा खासदार अशी श्रीरंग बारणे यांची ओळख आहे.

### खासदार सुप्रिया सुळे पहिल्या क्रमांकावर

**» सतराव्या लोकसभेत आतापर्यंतच्या कामगिरीनुसार बारामतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे (SUPRIYA SULE) पहिल्या नंबरवर आहेत. तर, त्यानंतर दुसरा क्रमांक मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पटकावला आहे. देशातील 'टॉप-टेन' खासदारांमध्ये महाराष्ट्राची बाजी मारली असून चार खासदार झळकले आहेत. त्यात शिवसेनेचे तीन, एक राष्ट्रवादीचा आहे. तर, तमिळनाडूतील दोन (सेंथीलकुमार एस आणि धनुष एम. कुमार), राज्यस्थान (पी. पी. चौधरी), उत्तरप्रदेश (पुष्पेंद्रसिंह चंदेल), कुलदीप राय शर्मा (अंदमान आणि निकोबार), झारखंड (विद्युत बरन महतो) येथील एकेक खासदार या यादीत आहेत. सुप्रिया सुळे आणि बारणे यांच्याखेरीज महाराष्ट्रातील शिवसेनेचे मुंबईतील राहूल शेवाळे (नवव्या)आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र कल्याणचे डॉ.श्रीकांत शिंदे (आठव्या) हे इतर दोन खासदार 'टॉप-टेन'मध्ये आहेत.भाजप, शिवसेनेचे प्रत्येकी तीन, डीएमकेचे दोन आणि काँगेस आणि राष्ट्रवादीचा एकेक खासदार या यादीत आहे.**

> मावळच्या जनतेने माझ्यावर सलगदोनवेळा विश्वास टाकला. देशाच्या संसदेत प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. जनतेच्या विश्वासाला सार्थ ठरेल असे कामकाज करत आहे. संसदेतील कामकाजात सक्रियपणे सहभाग घेवून मतदारसंघातील प्रश्नांबाबत सातत्याने आवाज उठवितो. प्रश्न मार्गी लावून घेतो. सतराव्या लोकसभेत आत्तापर्यंत ५०८ प्रश्न विचारले आहेत. १४८ वेळा चर्चेत सहभाग घेतला. सभागृहातील उपस्थितीती ९४ टक्के असून दहा टक्के खासगी विधेयके मांडली आहेत. संसदेतील या कामगिरीमुळे देशातील पहिल्या दहा खासदारांमध्ये माझा समावेश आहे. यामुळे आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली. यापुढेही मावळच्या जनतेची अशीच सेवा करत राहील.
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार, मावळ.**



मागील नऊ वर्षांपासून मतदारसंघात विविध विकास कामे केली आहेत. अनेक प्रलंबित कामे मार्गी लावली आहेत.

खासदार बारणे पहिल्या दहामध्ये आल्याने मतदारसंघातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. दरम्यान राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे अग्रभागी आहेत. तर, शिवसेनेचे श्रीकातं शिंदे आठव्या आणि राहुल शेवाळे नवव्या स्थानी आहेत.

---

# क्रांतिवीर चाफेकर वाडा, मोरया गोसावी मंदिरासाठी राज्य सरकारला साकडे!

## » आमदार अश्विनी जगताप : विकासासाठी निधीची पूर्तता करण्याची मागणी

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**श्री मोरया गोसावी मंदिर, चिंचवड देवस्थान ट्रस्टला 'क' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा घोषित करून निधीची पूर्तता करा. तसेच चाफेकर वाड्याचा तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास आराखड्यामध्ये समावेश करून विकास करण्यात यावा, अशी मागणी आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी गुरुवारी (दि. २३) विधानसभेत केली.**

विधानसभेत सन २०२३ -२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या चर्चेत आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी भाग घेतला. त्यावेळी त्यांनी दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांना अभिवादन करून ही मागणी केली.

आमदार जगताप म्हणाल्या, "माझ्या चिंचवड मतदारसंघातील पवना नदीच्या तीरावरील श्रीमन महासाधू श्री मोरया गोसावी मंदिर हे पुरातन जागरूक देवस्थान असून चिंचवड या ठिकाणी सदगुरू महासाधु श्री मोरया गोसावी यांनी योगमार्गाने संजीवन समाधी घेतली असून याला ४६० वर्षे पूर्ण झाले आहेत. राज्यभरातून व शहरातील लाखो भाविक श्रीमन महासाधू श्री मोरया गोसावी पुण्यतिथी उत्सवाला व दरमहा चतुर्थीला मोठ्या प्रमाणावर देवदर्शनासाठी येतात. श्री मोरया गोसावी मंदिर




देवस्थान व मंगलमुर्ती वाडा परिसर सुशोभीकरण करणे, पादुकामंदिर,सभा मंडप, संरक्षण भिंत उभारणे, मुख्य प्रवेशद्वार जतन संवर्धन व दर्जा वाढ करणे इत्यादी कामांकरिता शासनाच्या पर्यटन स्थळ विकास कार्यक्रम अंतर्गत श्री मोरया गोसावी मंदिर, चिंचवड देवस्थान ट्रस्टला 'क' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा घोषित करून निधीची पूर्तता करावी.

तसेच भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात एकाच कुटुंबातील तीन भावंडानी दिलेले बलिदान संपूर्ण देशामध्ये एकमेव स्फूर्तीदायक उदाहरण असलेले क्रांतिवीर चापेकर बंधूचा जन्म, बालपण व शिक्षण हे चिंचवडच्या ऐतिहासिक भूमीत झालेले आहे. चाफेकर वाड्याला हजारो देशभक्त व पर्यटक भेट देतात. श्री क्षेत्र चिंचवड क्षेत्राचा विकास व ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासनाच्या सहकार्याची व निधीची नितांत आवश्यकता आहे. चिंचवड या धार्मिक व ऐतिहासिक स्थळाचा शासनाच्या तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास आराखड्यामध्ये समावेश करून विकास करण्यात यावा.

### लोणावळा-खंडाळा परिसर पर्यटन विकसित करा...

**» त्याचप्रमाणे पुणे जिल्ह्यातील निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या मावळ तालुक्यात लोणावळा खंडाळा राजमाची कार्ला येथे थंड हवेच्या ठिकाणी देशभरातून पर्यटक येतात. लोणावळा-खंडाळा परिसराचा राष्ट्रीय पर्यटन केंद्र म्हणून विकसित होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या लोहगड विसापूर किल्ल्यांचे संवर्धनाची दुरुस्ती, पर्यटकांना सोयी-सुविधा पुरवणे त्याचबरोबर श्री एकविरा माता कार्ला लेणी व शिरगाव साई मंदिर येथे हे पुरातत्त्व विभागाच्या सूचनेनुसार पर्यटकांसाठी व भाविकांसाठी पायाभूत सोयी सुविधा उभारण्याकरिता निधीची आवश्यकता आहे. मावळ तालुक्यातील पर्यटनासाठी विशेष लोणावळा-खंडाळा कार्ला याचा सर्वांगीण पर्यटन विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. देशभरातील पर्यटकांना आकर्षित करण्याकरिता सोयीसुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने नियोजनबद्ध सदर परिसराचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.**

## संपादकीय

# महामार्गाचे महाधिंडवडे!


***क्रमांक ६६ या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू होऊन एक तप उलटून गेले आहे. जणू काही देशांना जोडणारा हा आंतरराष्ट्रीय मार्ग असावा अशा थाटात त्याचे काम सुरू आहे. गाजावाजा करत या महामार्गाच्या कामाला सुरुवात झाली.***

जमीन संपादन आणि इतर तांत्रिक बाबी पूर्ण झाल्या की जवळपास साडेपाचशे किलोमीटरचा पळस्पे ते बांदा इथपर्यंतचा हा मार्ग चार ते पाच वर्षांत पूर्ण होईल आणि एरव्ही रडत-खडत होणारी वाहतूक सुसाट होईल अशी अटकळ बांधली गेली होती. प्रत्यक्षात बारा वर्षे उलटून गेली तरी हा मार्ग पूर्ण होण्याचे नाव घेत नसून खऱ्या अर्थाने हा मार्ग पूर्ण होण्यास अजून दोन ते तीन वर्षे लागतील असे बोलले जात आहे. कारण काही ठिकाणी जमिनीचा वाद सुरू आहे. पनवेलच्या पळस्पे येथून सुरू होणारा हा मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचा आहे.

हा मार्ग केवळ गोवा राज्यापर्यंत नाही तर पुढे कर्नाटक, केरळातून तामिळनाडूत पोहचतो. मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक या मार्गावरून नेहमीच मोठ्या प्रमाणात होत आली आहे. कोकणात वाढलेले औद्योगिक क्षेत्र आणि विविध आकर्षक पर्यटन स्थळे यामुळे छोट्या-मोठ्या वाहनांची वर्दळ दुतर्फा अव्याहतपणे होत आहे. गणेशोत्सव, होळी आणि नाताळमध्ये प्रवासी वाहनांची संख्या वाढते. हा मार्ग पूर्वी तासंतास वाहतूक ठप्प करून ठेवत असे. म्हणून चौपदरीकरणाचा प्रस्ताव पुढे आला आणि काम सुरू झाले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या देखरेखीखाली याचे काम सुरू झाले. केंद्रात रस्ते वाहतूक खाते नितीन गडकरी यांच्याकडे असल्याने आणि त्यांच्या कामाचा उरक पाहता मुंबई-गोवा महामार्ग लवकर पूर्ण होण्यास काहीच अडचण असणार नसल्याचे म्हटले गेले, पण कूर्मगतीने सुरू असलेले काम पूर्ण होण्याचे नाव घेत नाही.सध्या या महामार्गाचे भिजत घोंगडं पडणं ना शासनाला शोभा देणारे, ना लोकप्रतिनिधींना शोभा देणारे आहे. मार्गाच्या रखडलेल्या कामाची खरं तर गिनिज बुकात नोंद झाली पाहिजे.देशात अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्गांची कामे भन्नाट वाटावी अशा वेगाने पूर्ण झाली. काही मार्गांवर लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर उतरविण्याचे प्रात्यक्षिकही झाले. मुंबई ते गोवा मार्गावर अशी अनेक ठिकाणे आहेत की तेथून प्रवास नकोसा वाटतो.

# छापील अक्षरांचे महत्व आजही अबाधित आहे !



समाज आजच्या काळात शिक्षण आणि बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात उंचीवर गेला असतानाही धर्म,श्रद्धा आणि देवाचा विषय निघाला की निरक्षर समुहासारखा का वागायला लागतो याची कारणे भारतीय धर्मग्रंथ आणि पोथ्या पुराणात दडलेले आहे. या ग्रंथामध्ये लिहिलेले सगळेच खरे असते आणि ते डोळे लावून पाळायचे असते असा संस्कार इथल्या समाज व्यवस्थेत प्रत्येकावर केला जातो म्हणून छापून आलेले सगळेच सत्य असते असे हा समाज सहज स्वीकारत असतो. अमुक एखादी गोष्ट खरी आहे कारण ती कुण्यातरी पुस्तकात लिहिलेली आहे असा दावा करताना लोक दिसतात याचे कारण छापील मजकुराला त्याच्या मेंदूत सत्याचे स्थान त्यांनी दिलेले आहे. इस्लाम मध्ये त्यांचा धर्मग्रंथ कुराण मध्ये लिहिलेला प्रत्येक शब्द खरा असून त्याचे अस्तित्व या जगाच्या अंतापर्यंत राहणार असल्याची मान्यता आहे. किमान मुसलमान असणाऱ्या प्रत्येकाला तसा " अकीदा " म्हणजे श्रद्धा ठेवावीच लागते.

नुकताच आलेला इंडियन रीडरशिप सर्व्हे आणि त्याचे आकडे सुद्धा हेच सांगतात की प्रसार माध्यमांची वेगवान अंगे गेल्या दहा वर्षात निर्माण झाली असली तरी मुद्रित माध्यमांवर भरवसा ठेवण्याचे प्रमाण कमी झालेले नाही. शोषलं मीडिया किंवा असंख्य वृत्त वाहिन्या आणि मोबाईलवर असणारे न्यूजसोर्स भलेली त्यांना पहिल्यांदा बातमी कळवतील परंतु त्याची सत्यता पडताळवून बघण्यासाठी आजही ६५ टक्के लोकांना वृत्तपत्रांवर अवलंबून राहावे लागते. एखादी खळबळजनक बातमी कुण्यातरी चॅनेलने दिवसभर चालवली तरी ती खरी आहे किंवा नाही हे तपासून बघण्यासाठी दुसऱ्या दिवशी घरी येणारे वृत्तपत्र बघणाऱ्या वाचकांची संख्या ७० टक्के असल्याचे हा सर्व्हे सांगत असेल तर छापील मजकुराचे महत्व किती असते हे नव्याने सांगण्याची गरज राहत नाही. एवढेच कशाला आपण दिवसभर टीव्हीपुढे बसून क्रिकेटचा सामना बघतो त्याचा निकालही पाहतो परंतु दुसऱ्या दिवशी त्याचे समालोचन वृत्तपत्रातच वाचून समाधान व्यक्त करीत असतो.

तरुण मुले वाचत नाहीत अशी पालकांची कायम ओरड असते ,आता तो आवाज थोडासा दबक्या सुरात येतोय कारण यावर्षीचा विद्यापीठ वाचक सर्व्हे असे सांगतोय की ७५ टक्के विद्यार्थ्यांच्या वाचन आलेखाने मुसंडी मारली आहे. व्यक्तिमत्व विकास,स्पर्धा परीक्षा,नोकरीच्या मुलाखती ,विद्यापीठ वक्तृत्व ,वादविवाद ,कलाक्षेत्र ,अभिनय अश्या सगळ्याच क्षेत्रात वाचनाच्या काठीशिवाय आपले काही खरे नाही याची जाणीव अलीकडील तरुणाईला झाली आहे त्यामुळे त्यांच्या वाचनाचा टक्का उंचावला आहे. या वाचनात वृत्तपत्र वाचकांचे प्रमाण तरुण वर्गात ३० टक्के वाढल्याचे दिसते ही अतिशय समाधानाची बाब आहे. वृत्तपत्र वाचनाची सवय तुम्हाला बदलत्या जगाशी सतत जुळवून ठेवते,तुम्ही कोणत्याही व्यवसाय,नोकरीत असाल तरी नियमित वृत्तपत्र वाचन त्यातील अडथळ्यांची चर्चा करून बाहेर पाडण्याचे मार्गही सुचवत असते.

इंटरनेट आणि टीव्हीच्या जागतिक बातम्या देणाऱ्या वाहिन्या यामुळे लाखो किमी दूर असणाऱ्या देशातील घडामोडी तात्काळ प्रत्येकाला समजतात ,त्या सगळ्या घडामोडींशी वाचक म्हणून आपणही एकरूप होतो ,शेवटी जगभरच्या घटनांचा बरा वाईट परिणाम आपल्या देशावर सुद्धा होत असतो त्यासाठी स्वतःलाच अद्ययावत ठेवण्याचे सहज अन सोपे माध्यम सध्याच्या काळात वृत्तपत्र झाले आहे. सकाळी उठल्यावर ठळक बातम्यांवरून नजर फिरवली आणि आवश्यक बातमीचे वाचन केले की दिवसभर वाट्याला येणाऱ्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्याची धिटाई प्रत्येकाच्या मनात वृत्तपत्रे निर्माण करीत असतात. भारतात प्रत्येक दिवसाचे काहीतरी खास महत्व असते त्याची वेळेवर आठवण करून देण्याचे काम वृत्तपत्रे प्रासंगिक लेख देवूणकरीत असतात. अनेकदा आपल्या आवडत्या व्यक्तीचा जन्म किंवा स्मृतिदिन आपण विसरतो पण नियमित वाचकाला वृत्तपत्र त्याची आठवण करून देत असते. सामाजिक,राजकीय किंवा धार्मिक कार्यकर्त्यांनी वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी सतत प्रयत्न करीत असले पाहिजे. पुस्तके वाचनाचा कंटाळा करणाऱ्या लोकांसाठी वृत्तपत्र वाचन हा योग्य पर्याय असतो. आपल्या प्रभावात असणाऱ्या लोकांनी वृत्तपत्रे वाचली पाहिजेत यासाठी त्यांना प्रेरित करायला हवे.

# अडचणींवर मात करत भारताची आघाडी!

**मी माझ्या देशाबाबत भरपूर समाधानी आहे. इथल्या औद्योगिक प्रगतीबाबत समाधानी आहे. समाधानी आहे म्हणजे जे चालू आहे ते १०० टक्के योग्य आहे असे नाही. सुधारणेला भरपूर वाव आहे. उद्योगांना भरपूर अडचणी आहेत, पण सगळं काही एका रात्रीत शक्य नसते. त्याला वेळ लागतो.**

सगळीकडून त्यासाठी दबाव आवश्यक असतो, पण म्हणून आपण खूपच पिछाडीवर आहोत असं समजण्याची गरज नाही. कोणत्याही स्पर्धेत पहिल्या पाच-दहात जाणारे सर्वच स्पर्धक नेहमी तोडीस तोड असतात, पण सतत देश भिकेलाच लागलाय, परिस्थिती खूपच अवघड आहे वगैरे रडगाणे गाणारे मात्र फक्त निराशावादीच असतात. स्वत:ही काही करत नाहीत आणि इतरांनाही प्रोत्साहन देत नाहीत. असल्या चर्चा आजकाल सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चालतात. प्रिंट आणि सोशल मीडियावर मी नेहमी आर्थिक लेख, जागतिक अर्थव्यवस्था, भारतीय अर्थव्यवस्था, राज्यातील एकूण आर्थिक परिस्थिती यावर बारकाईने वाचन करत असतो. मी कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधित नाही म्हणून मला अर्थव्यवस्थेचे तटस्थ विश्लेषण करणे आवडते. एकदा का बजेट संसदेत मांडले की त्यावर अनेक लेख, विश्लेषण हे प्रिंट मीडिया आणि हल्ली सोशल




मीडियावर येत असते. बरेच लोक हे असे लेख फॉरवर्ड करत असतात. आर्थिक क्षेत्रात अनेक उच्च पदव्या घेतलेले काही लोक जेव्हा तटस्थ विश्लेषण करत नाहीत आणि देश फक्त २०१४ नंतरच कसा विकसित झाला असे सांगतात, तेव्हा तर मला त्याचे फारच आश्चर्य वाटत असते.

हे म्हणजे असे झाले की मी आणि बायको कार चालवत नाशिकहून पुण्याला चाललो होतो आणि नाशिकहून नाशिक फाटा पुणेपर्यंत मी कार चालवली आणि नाशिक फाटा पुणे येथून शिवाजी नगरपर्यंत बायकोने कार चालवली तरीही बायको तिच्या नातेवाईकांना सांगायची की मी आज नाशिकहून पुण्यापर्यंत कार चालवली. असो, अर्थशास्त्राचे नियम हे तुम्ही कुठल्या राजकीय पक्षाशी संबंधित आहात किंवा कुठल्या उद्योजकीय लॉबीशी संबंधित आहात यावर ठरत नसतात. तेसुद्धा तटस्थपणे आपले काम करत असतात. म्हणूनच मी माझ्या अनेक लेखांमध्ये सरकारी मालमत्ता विकणे म्हणजे देश विक्री करणे नाही, असे आवर्जून सांगत असतो. कारण एक मालमत्ता विकून त्यातून सरकारची दुसरी मालमत्ता तयार होत असेल तर त्याला देश विक्रीस काढला, असे अजिबात म्हणता येणार नाही.

विक्री करण्याच्या पद्धतीवर तुम्ही जरूर टीका करू शकता. त्याचे फायदे-तोटे काय याबाबत वादविवाद होऊ शकतो. तरुणांना सरकारी नोकऱ्या नाहीत. त्यामुळे माझा नेहमी प्रयत्न असतो की नवीन उद्योजक घडावेत, स्वतःचा काहीतरी व्यवसाय करावा व यासाठी तरुणांना प्रोसाहन मिळावे, परंतु सोशल मीडियावरील नकारात्मक चर्चा, लेखन, ब्लॉग बघितले तर लोक नवीन उद्योग सुरू करणार नाहीत.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ठाकरे-फडणवीसांची भेट: शिंदे गटात अस्वस्थता?

## “देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्याचे पाहून बरे वाटले : शंभूराज देसाई

। मुंबई। महाईन्यूज ।

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज (२३ मार्च) विधीमंडळाच्या गेटवर भेट झाली. या भेटीवर शिवसेना नेते मंत्री शंभूराज देसाई (SHAMBHURAJ DESAI) यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीसांनी आज विधीमंडळात एकत्रच प्रवेश केला. सत्तापालट झाल्यावर ठाकरे-फडणवीस एकमेकांना पहिल्यांदाच भेटले हे पाहून बरे वाटले असते. मात्र तेव्हा मी सभागृहात होतो. यावेळी देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांनी गप्पाही मारल्या. यानंतर राजकीय चर्चांना उधाण आले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सतराव्या दिवशी उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस विधानसभेत आज एकत्र दिसून आले. 2019 मध्ये शिवसेना आणि भाजपा या दोन्ही पक्षात मुख्यमंत्रीपदावरून दुरावा निर्माण झाल्यानंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार बनले. परंतु काही महिन्यांपूर्वी एकनाथ शिंदेंनी काही आमदारासह बंड केले आणि भाजपाच्या साथीने सरकार बनवले.**



यावर बोलताना देसाई म्हणाले, देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्याचे पाहून बरे वाटले. फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना सांगितले असेल, शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आहे. निवडणूक आयोगाने तो निर्णय दिला आहे. तर, तुम्ही आता शिंदे यांच्याबरोबर एकत्र काम करा, असे फडणवीसांनी म्हटल्याची चर्चा विधिमंडळाच्या आवारत होती, असेही शंभूराज देसाई म्हणाले.

उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीमुळे शिंदे गटात चलबिचल आहे, असे महाविकास आघाडीचे नेते म्हणतात, असे विचारले असता, देसाई म्हणाले, आमच्या लोकांच्या चालण्यात, बोलण्यात कुठे जाणवते का? आम्ही अधिवेशनाचे आणि दिलेल्या विभागाचे काम करत आहेत. चलबिचल आणि चिंता करण्याचे काम नाही.

पंचवीस वर्षांची दोस्ती मोडून वेगळे झालेले दोन नेते आज विधानभवन परिसरात एकत्र येताना पाहुन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. युती तुटल्यानंतर नियमितपणे एमेकांवर टीकास्त्र डागणारे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानभवन परिसरात एकत्र एन्ट्री घेतली, त्यामुळे सगळ्यांनीच भुवया उंचावल्या. या दोघांच्या एकत्र येण्याने युतीचा नवा फॉर्म्युला तयार होणार का अशी चर्चाही दबक्या आवाजात रंगली. यावर आता शिवसेनेतील मंत्री शंभूराज देसाई यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

शंभूराज देसाई म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस एकत्र भेटल्याचे पाहून चांगले वाटले. उद्धव ठाकरेंना फडणवीस यांनी सांगितल असेल की, शिवसेना एकनाथ शिंदे यांची असून निवडणूक आयोगाने शिक्कामोर्तबसुद्धा केले आहे. त्यामुळे तुम्ही आता एकनाथ शिंदे यांच्याबरोबर एकत्र काम करा. फडणवीसांनी असे म्हटल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे, असे शंभूराज देसाई म्हणाले.

### इशारा कुणाला, शिंदेंना की आघाडीला?

**»उलट सरकार पडेल म्हणून महाविकास आघाडी तारखावर तारखा देत आहे. मात्र, अजूनही सरकार पडलेले नाही. फडणवीस आणि शिंदेंच्या नेतृत्वाखाली सरकार भक्कम असल्याचेही देसाई म्हणाले.**



**“आमच्या गटातील लोकांच्या चालण्या, बोलण्यात तुम्हाला आज कुठं तसे जाणवले का? आम्ही नेहमीप्रमाणे आज विधानसभेत आलो आणि अधिवेशनाचे, दिलेल्या विभागाचे काम करत आहे. चलबिचल आणि चिंता करण्याचं काम आमच्या पक्षातील नेते करत नाही. तसेच महाविकास आघाडीतील नेते सरकार पडेल म्हणून तारखावर तारखा देऊन थकली आहे. पण, अजूनही सरकार पडलेले नाही आणि यापुढेही पडणार नाही. कारण, शिंदे-फडणवीसांच्या नेतृत्वाखाली सरकार राज्यात भक्कमपणे उभे आहे.**

**- शंभूराजे देसाई, मंत्री, शिवसेना**

# नागपुरात 'हाफ' तिकीटला 'फुल्ल' प्रतिसाद

## » नागपूर एसटी स्थानकावर महिला प्रवाशांची गर्दी

।नागपूर महाईन्यूज ।

**नागपूर : राज्य सरकारने राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवेत तिकीटदरात ५० टक्के सवलत दिल्याचा पुरेपूर उपयोग करताना शहरातील महिला दिसत आहेत. या हाफ तिकीट योजनेला फुल्ल प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. महिलांनी शासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले.**





‘काय ते तिकिटाचे पैसे जातील, तुम्हीच जाऊन या’, म्हणून बऱ्याच प्रसंगांमध्ये महिला आपले पाऊल मागे घ्यायच्या. मात्र, राज्याच्या अर्थसंकल्पात एसटीत महिलांना ५० टक्के सवलत मिळेल, अशी घोषणा झाल्यापासून महिलांमध्ये उत्साह आहे.

शुक्रवारपासून राज्यात ही सवलत लागू झाली. ५४वर्षीय राधाबाई मसराम म्हणाल्या, ‘बरेचदा लांबचा प्रवास म्हटले तर चांगलीच रक्कम मोजावी लागायची. मात्र, या सवलतीने मोठा दिलासा आमच्यासारख्या सामान्य घरातील महिलांना मिळाला आहे’. हर्षा कोठे म्हणाल्या, ‘माझ्या दोन मुली आणि मी नक्कीच आता भरपूर फिरू. या सवलतीमुळे भरपूर बचत होईल. एसटी प्रवासात महिलांची वाढ होईल’.

‘ही सवलत दिल्यामुळे सरकार आणि एसटीला फायदा होईलच. शिवाय, करोनाकाळानंतर खासगी बसमालकांनी जे लुटले, ते पाहता बऱ्याच महिला एसी बसदेखील सोडून आपल्या लालपरीकडे वळतील’, असे मत सुवर्णा पंत यांनी व्यक्त केले. बस वाहक जाकीर खान यांनी दिलेल्या माहितीनुसार, ‘गेल्या दोन दिवसांपासून महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यात काही महिलांना या सवलतीबाबत माहिती नाही. त्यांना आम्ही स्वतः जागरूक करत आहोत. एसटीची प्रवासीसंख्या वाढण्यास नक्कीच मदत होतील.’

### कुठलाही पुरावा नको

».सवलतीचा लाभ घेण्यासाठी महिलांना कुठलाही पुरावा सादर करण्याची गरज नाही. एसटी बसमध्ये पूर्वीपासून पाच वर्षांखालील मुलांना आणि ७५ वर्षांवरील महिलांना मोफत प्रवासाची सोय आहे. याबाबत वाहतूक नियंत्रक चंदू कामडी म्हणाले, ‘तृतीयपंथी (महिला) असो किंवा बारा वर्षांहून मोठ्या मुली, प्रत्येकासाठी ही सवलत आहे. महाराष्ट्र राज्यात कुठेही एसटीने प्रवास करताना कोणतेही ओळखपत्र न दाखवता या सवलतीचा लाभ महिला घेऊ शकतात.’

### स्पष्ट आदेशाच्या अभावामुळे कोंडी

**» वाहक विशाल पाल म्हणाले, ‘सवलतीच्या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात महिला प्रवास करीत आहेत. मात्र, ही सवलत महाराष्ट्रातील रहिवाशांसाठी आहे. त्यामुळे इतर राज्यांतील प्रवाशांना कसे ओळखायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे.’**

# आम्ही लढू आणि जिंकू!

## » राहुल गांधींच्या शिक्षेविरोधात काँग्रेसचा एल्गार , मोदी आडनाव बदनामी प्रकरणात 2 वर्षांची शिक्षा

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

**मोदी आडनाव बदनामी प्रकरणी सुरत न्यायालयाने राहुल गांधी यांना दोषी ठरवण्यात आले आहे. त्यांना या प्रकरणात सुरत कोर्टाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राहुल गांधींनी मोदी आडनावावर भाष्य करताना म्हटले होते की, सर्व चोरांचे आडनाव मोदी आहे का?. या प्रकरणी राहुल गांधी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी सुरतच्या न्यायालयाने सकाळी 11 वाजता निकाल देत राहुल गांधींना दोषी ठरवले आहे. या प्रकरणात राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आलेली आहे. तर या प्रकरणात त्यांना 15 हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन देखील मंजूर करण्यात आला आहे. मोदी आडनावावरून खिल्ली उडवल्याप्रकरणी राहुल गांधी यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.**



मात्र, याप्रकरणी राहुल गांधी यांना जामीन मिळाला आहे. परंतु, यावरून काँग्रेसने आता केंद्र सरकारविरोधात निषेध व्यक्त केला आहे. हुकुमशाह घाबरल्याने ईडी, पोलीस, गुन्हे आणि शिक्षा देऊन भीती घालण्याचा प्रयत्न केला जात आहे, असं काँग्रेसने अधिकृत ट्वीटर खात्यावर म्हटलं आहे. सुरतच्या सीजेएम कोर्टात पोहोचल्यावर कोर्टाने राहुल गांधी यांना दोषी ठरवले. यानंतर कोर्टाने राहुल गांधींना विचारले की तुम्हाला काय म्हणायचे आहे, तेव्हा राहुल गांधी म्हणाले, मी नेहमीच भ्रष्टाचाराच्या विरोधात बोलतो. मी मुद्दाम कोणाच्या विरोधात बोललो नाही. यामुळे कोणाचेही नुकसान झाले नाही.

2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राहुल गांधी हे कर्नाटकातील कोलारमध्ये म्हणाले होते की, “सर्व चोरांची आडनावे मोदी कशी आहेत?”

राहुल गांधींच्या या वक्तव्यानंतर सुरत पश्चिमेतील भाजप आमदार पूर्णेश मोदी यांनी त्यांच्यावर मानहानीचा खटला दाखल केला होता. राहुल गांधींनी मोदी समाजाचा अपमान केल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले होते.

यानंतर हे प्रकरण सुरतच्या न्यायालयात पोहोचले. या प्रकरणात राहुल गांधी यांना याआधी 9 जुलै 2020 रोजी सुरत न्यायालयात हजर राहावे लागले होते. तर गेल्या महिन्यात पूर्णेश मोदी यांनी या प्रकरणी लवकर निर्णय घेण्यासाठी गुजरात उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

### सुनावणीदरम्यान शिक्षा सुनावली...

»दरम्यान, यानंतर उच्च न्यायालयाने सुरत न्यायालयाला लवकरात लवकर सुनावणी घेण्याचे आदेश देताना उच्च न्यायालयात सुनावणीसाठी केलेला अर्ज फेटाळला होता. त्यानंतर गेल्या महिनाभरापासून सुरत न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. यामध्ये दोन्ही बाजूंच्या वकिलांकडून युक्तिवाद करण्यात आला. यावेळी राहुल गांधी यांच्या वकिलाने मोदी हे कोणताही विशिष्ट जातीचा समुदाय नसल्याचे म्हटले होते. राहुल गांधींचे सर्व आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरच होते. अशावेळी त्यांनी मानहानीचा खटला दाखल करावा. यानंतर सुरत कोर्टातील मुख्य न्यायदंडाधिकारी एचएच वर्मा यांनी निकालासाठी २३ मार्च ही तारीख निश्चित केली होती. त्यानुसार सुनावणी करत राहुल गांधी यांना शिक्षा सुनावण्यात आली आहे.

### धाडसामुळे हुकुमशाह घाबरला

».काँग्रेसच्या अधिकृत ट्विटर खात्यावरून केंद्र सरकावर निशाणा साधण्यात आला आहे. “सगळ्यांना माहिती आहे. राहुल गांधी हुकुमशाहांविरोधात आवाज उठवत आहेत. चुकीला चूक म्हणण्याचं धाडस करत आहेत. या धाडसामुळे हुकुमशाह घाबरला आहे. कधी ईडी, कधी पोलीस, कधी गुन्हे, कधी शिक्षा देऊन भीता घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राहुल गांधी याप्रकरणी न्यायसंगत अर्ज दाखल करतील. आम्ही लढू आणि जिंकू!” असा विश्वास या ट्वीटमधून व्यक्त करण्यात आला आहे.

# ‘आनंदाचा शिधा’चे वितरण महिनाभर राहणार सुरु

## » आनंदाचा शिधा” संच उपलब्ध करून देण्याचा निर्णय 22 फेब्रुवारी 2023 रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना “आनंदाचा शिधा” संचाचे वितरण २२ मार्च २०२३ गुढीपाडव्यापासून पुढील एक महिनाभर सुरु राहणार असे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.**

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब, औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा, अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शेतकरी शिधा पत्रिकाधारकांना गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी सणांनिमित्त नियमित अन्नधान्याव्यतिरिक्त प्रत्येकी १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर खाद्यतेल या ४ शिधा जिन्नसांचा समावेश असलेला “आनंदाचा शिधा” संच उपलब्ध करुन देण्याचा निर्णय २२ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार काही जिल्ह्यांत वितरण सुरू झाले आहे.



यापूर्वी सन २०२२ मधील दिवाळी सणानिमित्त ऑक्टोबर २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांना “आनंदाचा शिधा” संचाचे वितरण करण्यात आले होते, असे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले

### मागील वर्षी झाली सुरुवात

» सर्वसामान्यांची दिवाळी गोड व्हावी तसेच नागरिकांना महागाईपासून दिलासा मिळावा याकरीता फक्त 100 रुपयांमधे प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि खाद्यतेल देण्याचा निर्णय राज्य सरकारकडून मागील वर्षी दिवाळीमध्ये झाला होता. जिल्हयातील सात लाख लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळण्याच्या हृष्टीने “आनंदाचा शिधा”ची सुरुवात करण्यात आली होती.

### जाहिरातीवरच समाधान मानावे लागले

» आपलीही दिवाळी गोड होईल या आशेने नागरिकांनी दुकानांमध्ये रेशन दुकाने गाठली. पण ग्राहकांना फक्त जाहिरातीवरच समाधान मानावे होते. कारण सरकारचा हा ”आनंदाचा शिधा” रेशन धान्य दुकानांपर्यंत पोहोचलाच नव्हता. ”आनंदाचा शिधा” हे किट कधी देणार अशी विचारणा शिधापत्रिकाधारकांकडून करण्यात आली होती.

# दिसायला गोड पण कामात कडक! प्राजक्ता माळीची पोस्टात एन्ट्री!

मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींच्या यादीत प्राजक्ता माळी हे नाव कायमच आघाडीवर असते. तिने अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केलं आहे. सुरुवातीच्या काळात काही मालिकांत काम करून प्राजक्ता घराघरांत पोहोचली.

फक्त मालिकाच नव्हे तर मराठी चित्रपटांमध्ये काम करण्याचंही स्वप्न तिनी पाहिलं आणि ते स्वप्न सत्यात उतरवलं. मालिका, चित्रपट, वेबसिरीज या तिन्ही माध्यमांमध्ये प्राजक्ता उत्तम काम करतेच, पण त्याबरोबरीनेच 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारीही तिनी उत्तमरीत्या पेलली आहे.सुरुवातीपासूनच ती 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' ह्या कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. प्राजक्ताने अधिक मेहनत करत कलाविश्वात स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. आता प्राजक्ता माळी आपल्या चाहत्यांना आश्चर्यचकित करणार आहे. कारण ती आता पोस्टात दिसणार आहे. 'पोस्ट ऑफीस उघडं आहे' या मालिकेत तिची एन्ट्री होणार आहे. तब्बल ६ वर्षांनी ती मालिकेत पुनरागमन करते आहे. तिला मालिकेत पाहण्याची संधी मिळत असल्याने तिचा चाहतावर्ग नक्कीच खूश होणार आहे आणि तिच्या चाहत्यांसाठी ही पर्वणी ठरणार आहे. पारगाव पोस्टात तिच्या येण्यामुळे काय धमाल होणार आहे, हे पाहणे रंगतदार ठरेल. पोस्टात संगणक येण्याने आधीच सर्वांच्या कामात गोंधळ निर्माण झाले आहेत. त्यात आता पोस्टात नवीन एन्ट्री झाल्यामुळे आणखीनच मजा येणार आहे. प्राजक्ता सगळ्यांची शाळा घेणार आहे.



# घरातील प्रत्येक नोकराच्या रोज पाया पडते रश्मिका

रश्मिका मंदाना 'पुष्पा' सिनेमानंतर नॅशनल क्रश बनली आहे. साऊथच्या प्रेक्षकांसोबतच हिंदी प्रेक्षकांच्या मनातही तिच्यासाठी एक खास जागा आहे. तिनं नुकत्याच दिलेल्या मुलाखती दरम्यान आपल्या रोजच्या डेली रुटीनविषयी बातचीत केली.

यामध्ये तिनं काही अशा गोष्टी शेअर केल्या ज्या खरंतर प्रत्येकाला शिकायला हव्यात. रश्मिका आयुष्यातील खूप छोट्या छोट्या गोष्टींना महत्त्व देते. तिनं सांगितलं की ती तिच्या कुटुंबातील मोठ्यांचेच नाही तर घरात काम करणाऱ्या मदतनीसांच्या देखील पाया पडून आशीर्वाद घेते.

रश्मिकानं यामागचं एक खास कारणही सांगितलं. मराठी सिनेमा म्हणजे...', 'या' दिग्गज अभिनेत्याचं नाव घेत सुबोधनं एकाच वाक्यात संपवला विषय.

रश्मिका मंदाना साऊथ आणि हिंदी सिनेमांची प्रसिद्ध अभिनेत्री आहे. पण असं असलं तरी तिच्या आई-वडीलांना याचा गर्व नाही. ते तिला खूप साधारण मुलीसारखेच वागवतात.रश्मिकानं बाजार इंडियाला दिलेल्या एका मुलाखतीत आपल्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित अनेक खुलासे केले.

रश्मिका म्हणाली,' 'माझ्यासाठी खूप छोट्या छोट्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मी माझ्या आई-वडीलांसोबत वेळ घालवते. माझ्या मित्र-मैत्रिणींना भेटते. यामुळे मला आनंद मिळतो.

शब्दात खूप ताकद असते आणि ते आपल्याला चांगलं माणूस बनवू शकतात किंवा बिघडवू देखील शकतात. त्यामुळे कोणी मला काही समजवत असेल किंवा सांगत असेल तर ते माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे".

"मी घरी आल्यावर माझ्या डायरीत खूप छोट्या छोट्या गोष्टींची नोंद करून ठेवते. माझी एक सवय आहे की मला आदर म्हणून कुणाच्याही पाया पडायला लाज वाट नाही"."मी माझ्या घरात काम करणाऱ्या मदतनीसांच्या देखील पाया पडते. मी तिथे भेदभाव करत नाही. मी सगळ्यांचा आदर करते..मी अशीच आहे".



# प्रियदर्शनी इंदलकरच्या 'फुलराणी' चित्रपटाबद्दल प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीने केलेली पोस्ट चर्चेत





मराठी अभिनेता सुबोध भावे आणि अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकरचा 'फुलराणी' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला. या चित्रपटातील गाणी, ट्रेलर सध्या चांगलाच चर्चेत आहे. या चित्रपटात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमामुळे प्रसिद्धीझोतात आलेली अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर ही प्रमुख भूमिकेत पाहायला मिळत आहे. हा चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेत्री भार्गवी चिरमुलेने पोस्ट शेअर केली आहे.

भार्गवी चिरमुले ही सोशल मीडियावर चर्चेत असते. नुकतंच भार्गवीने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात तिने प्रियदर्शनीबरोबरचे फोटोही पोस्ट केले आहेत. त्याबरोबर तिने कॅप्शन लिहित प्रियदर्शनीच्या 'फुलराणी' चित्रपटाचे कौतुक केले आहे."काही माणसें आपल्याला भेटतात ती आपली होऊन जातात....पुढे जाऊन ती माणसे वेगळ्या वाटेला जातात तरी त्याचाशी ते बंध तसेच राहतात... त्यांची प्रगती त्याचं यश त्यांची मेहनत पाहून आपल्याला कायम आनंद आणि अभिमान वाटत राहतो आणि मग ते कायमचे ऋणानुबंध होऊन जातात, तशीच हे माझी लाडकी प्रियदर्शनी अर्थात फुलराणी आज तिचा पहिला सिनेमा प्रदर्शित होतोय, नक्की जाऊन जवळच्या चित्रपटगृहात पहा....संपूर्ण टीम ला ऑल द बेस्ट. झगमगा आणि प्रियदर्शिनीला पाहा, गॉड ब्लेस यू माय लव्ह आणि लवकर भेट", असे भार्गवी चिरमुलेने म्हटले आहे.दरम्यान फुलराणी हा चित्रपट गेल्या २२ मार्चला प्रदर्शित झाला. या चित्रपटात सुबोध भावे विक्रम ही भूमिका साकारताना दिसत आहे. तर सुशांत शेलार सौरभ ही व्यक्तिरेखा साकारत आहे. सध्या या चित्रपटाची ट्रेलर, गाणी सुपरहिट झाली आहेत.

# 'तुलसी'ने बदललं स्मृती इराणींचं आयुष्य

केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांचा आज वाढदिवस आहे. राजकारणात येण्याआधी स्मृती इराणी या अभिनेत्री होत्या. मालिकांमध्ये काम करुन त्यांनी लोकप्रियता मिळवली. छोट्या पडद्यावरील आदर्श सून म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जायचं. राजकारणात सक्रिय झाल्यानंतर आता त्या देशाच्या महिला व बालविकास मंत्री आहेत. स्मृती इराणी यांचा जन्म २३ मार्च १९७६ रोजी दिल्लीमध्ये झाला. त्यांचे वडील पंजाब तर आई आसामची आहे. स्मृती इराणी यांचे वडील कुरिअर कंपनीत कामाला होते. घरची परिस्थिती पाहून स्मृती इराणी यांनी शालेय जीवनानंतर बीकॉमची पदवी मिळवण्यासाठी महाविद्यालयात प्रवेश न घेता बाहेरुन परिक्षा देण्यासाठी अर्ज भरला होता. परंतु, त्यांना पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करता आले नाही.घरातील आर्थिक परिस्थितीला हातभर लावण्यासाठी स्मृती इराणी यांनी एकेकाळी वेटरची नोकरीही केली आहे. त्यानंतर काही काळ सौंदर्य प्रसाधने विकण्याचं कामही त्यांनी केलं. १९९८मध्ये स्मृती इराणींनी मिस इंडियासाठी ऑडिशन दिलं होतं. परंतु, त्यांच्या वडिलांचा याला विरोध होता. आईने पाठिंबा दिल्यानंतर इराणींनी मिस इंडिया स्पर्धेत भाग घेऊन फिनाले पर्यंत बाजी मारली. परंतु, मिस इंडियाचा खिताब त्या जिंकू शकल्या नाहीत. स्मृती इराणींनी अनेक ऑडिशन दिल्यानंतर २००० साली एकता कपूरच्या 'क्योंकि सास भी कभी बहू भी' या मालिकेत त्यांना ब्रेक मिळाला आणि त्यांचं नशीब उजळलं. या मालिकेत तुलसी हे पात्र साकारुन त्या घराघरात पोहोचल्या. मालिकेतून प्रसिद्धी मिळाल्यानंतर २००३ साली त्यांनी भाजपात प्रवेश केला. त्यानंतर लगेचच त्यांना भाजपाच्या महिला विंगचं उपाध्यक्ष पद देण्यात आलं. २०१० साली त्या भाजपा महिला विंगच्या अध्यक्ष आणि पक्षाच्या राष्ट्रीय सचिव बनल्या. २०१४ साली लोकसभा निवडणुकीत त्यांना भाजपाकडून तिकीट मिळालं. अमेठीमधून काँग्रेस नेते राहुल गांधींच्या विरोधात त्या उभ्या राहिल्या होत्या. परंतु, या निवडणुकीत त्यांना हार



# आयपीएलपूर्वी BCCIने फ्रँचायझीला दिला धक्का!

## प्रीमियर लीगच्या आगामी हंगामासाठी शिबिरात सामील होण्यापूर्वी 3 ते 4 दिवसांचा ब्रेक मिळणार




।चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत भारतीय संघाचा 1-2 असा पराभव झाला आहे. ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेचा भाग असलेल्या भारतीय खेळाडूंना 31 मार्चपासून सुरू होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी हंगामासाठी त्यांच्या संघांच्या शिबिरात सामील होण्यापूर्वी तीन ते चार दिवसांचा ब्रेक मिळेल.**

गतविजेत्या गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या सीझनच्या पहिल्या सामन्यात अहमदाबादमध्ये आमनेसामने येणार आहेत.

हे समजण्यासारखे आहे की विश्वचषक लक्षात घेऊन खेळाडूंच्या फिटनेस वर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

त्यांना विश्रांती देणे सर्वात महत्त्वाचे आहे. बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, काही खेळाडू थेट आयपीएल संघात सामील होऊ शकतात परंतु त्यांच्याकडे तीन-चार दिवसांचा ब्रेक घेण्याचा पर्याय असेल जेणेकरून ते त्यांच्या आयपीएल संघांमध्ये सामील होण्यापूर्वी घरी विश्रांती घेऊ शकतील.

फिरकीपटू युजवेंद्र चहलही त्याच्या घरी पोहोचला आहे. बंगळुरूकडून खेळणाऱ्या चहलने दिल्लीत पोहोचल्याची गोष्ट इंस्टाग्रामवर शेअर केली.

जरी खेळाडू थेट प्रशिक्षण शिबिरात सामील झाले तरी ते किमान पुढील 72 तास सराव करतील अशी शक्यता नाही. बोर्डाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रेयस अय्यरच्या पाठीवर शस्त्रक्रिया होणार असून तो आयपीएलचा भाग होणार नाही. आता झालेल्या शस्त्रक्रियेमुळे त्याला ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या विश्वचषकापूर्वी पुनरागमन करण्याची संधी मिळू शकते. मात्र, या क्षणी त्याची विश्वचषक संघात स्थान मिळण्याची शक्यता कमी आहे.

जसप्रीत बुमराह आणि प्रसिद्ध कृष्णा हे दोन खेळाडू आहेत ज्यांच्या पाठीवर शस्त्रक्रिया झाली आहे.

# 'अल्लाह मेरी दुआ कबूल करो!

## सानियाच्या मिर्झाच्या 'त्या' पोस्टनं वेगळीच चर्चा





। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**प्रसिद्ध टेनिसपटू सानिया मिर्झा ही भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये नेहमीच चर्चेचा विषय असते. गेल्या वर्षांपासून सानिया तिच्या वैवाहिक आयुष्यातील वादळामुळे नेटकऱ्यांच्या रडारवर आहे. त्यावरुन तिला नेटकऱ्यांनी धारेवर धरले आहे. वेगवेगळे प्रश्न विचारुन हैराण केले आहे.**

आता सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या त्या फोटोंनी सानिया ट्रोल झाली आहे. सानिया तिच्या कुटूंबियांसमवेत सौदी अरबला गेली होती. त्यावेळी कुटूंबासमवेत फिरतानाचे व्हिडिओ व्हायरल झाले असून त्यावर चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी दिलेल्या कमेंट्स भन्नाट आहे. सानियाच्या त्या व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये ती तिच्या कुटुंबासमवेत दिसते आहे. यासगळयात तिचा पती पाकिस्तानी क्रिकेटर शोएब मलिक न दिसल्यामुळे तिला नेटकऱ्यांनी प्रश्न विचारुन भंडावून सोडले आहे. यापूर्वी देखील सानियाला तिच्या वेगवेगळ्या पोस्टवरुन नेटकऱ्यांनी छेडल्याचे दिसून आले आहे. सानियानं मात्र नेटकऱ्यांना कोणतेही उत्तर दिलेले नाही. विशेष म्हणजे सानियाच्या त्या फोटोंवर शोएबची कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही

### नात्यामध्ये आलं अंतर....

» गेल्या वर्षी सानिया आणि तिचा पती शोएब मलिक यांच्या नात्यामध्ये दुरावा आल्याचे दिसून आले. शोएबच्या पोस्टनंतर त्यांच्या नात्यातील दुराव्याविषयी जोरदार चर्चा सुरु झाली होती. दरम्यान सानियानं देखील आता फक्त देवालाच माझी काळजी असे म्हटले होते. जगभरामध्ये मोठा चाहतावर्ग असणाऱ्या सानियाच्या त्या बातमीनं मोठी खळबळ उडाली होती. आताही व्हायरल झालेल्या फोटोंवरुन सानियाला ट्रोल करण्यात आले आहे. काही नेटकऱ्यांनी सानियाच्या त्या व्हिडिओवरुन तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल प्रश्न विचारण्यास सुरुवात केली आहे.

# एकाच सामन्यात दोन लाजिरवाण्या विक्रमांची नोंद

। पंजाब। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२२ चा तिसरा सामना रॉयल चॅलेंजर्स बँगलोर आणि पंजाब किंग्ज यांच्यात खेळवण्यात आला होता. या सामन्यात चौकार-षटकारांचा पाऊस पडल्याने चाहत्यांचं जबरदस्त मनोरंजन झालं होतं. पण या सामन्यात आरसीबीचा पराभव झाला होता. आरसीबीचं नेतृत्व फाफ डू प्लेसिसकडे सोपवण्यात आलं होतं. या सामन्यात आरसीबीने २०५ धावा कुटल्यानंतरही त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. तसंच या पराभवासोबत आरसीबीच्या नावावर दोन लाजिरवाण्या विक्रमांची नोंदही झाली. हे विक्रम अन्य कोणत्याही संघ्याच्या नावावर नोंदवण्यात आले नाहीत.**

**RCB च्या नावावर या लाजिरवाण्या विक्रमांची नोंद**



आरसीबीच्या खेळाडूंची फलंदाजी आयपीएलमध्ये नेहमीच आकर्षणाचं केंद्रबिंदू ठरली आहे. पण आरसीबीच्या गोलंदाजीबाबत अनेकदा टीका-टीप्पणी करण्यात आली. या सामन्यात आरसीबीची गोलंदाजी फ्लॉप ठरली आणि संघ २०६ धावा डिफेंड करण्यातही अपयशी ठरला. या पराभवासोबत आरसीबीने आयपीएलच्या एका इनिंगमध्ये सर्वात जास्त वाईड चेंडू फेकण्याचा अनोखा विक्रम केला. हा लाजिरवाणा विक्रम याआधी पंजाब किंग्जच्या नावावर होता. पंजाबने एका सामन्यात १९ वाईड चेंडू फेकले होते. पण आरसीबीने या सामन्यात एकूण २१ वाईड चेंडू टाकले आणि हा विक्रम त्यांच्या नावावर करून घेतला.